# नागरी बँकांच्या समस्या सोडवा

## ‘सकाळ माध्यम समूहा’चा पाठपुरावा; केंद्रीय सहकारमंत्री शहा यांना निवेदन

**पुणे, ता. २० :** केंद्राच्या बँकिंग नियमन कायद्यातील सुधारणा आणि रिझर्व्ह बँकेच्या कठोर नियमांमुळे नागरी सहकारी बँका, जिल्हा बँका आणि सहकारी पतसंस्थांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या प्रश्नांवर मार्ग काढून केंद्र सरकारने सहकार क्षेत्राला दिलासा द्यावा, याबाबतचे निवेदन ‘सकाळ माध्यम समूहा’च्या वतीने केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांना देण्यात आले.



पुण्यात ऑक्टोबर महिन्यात ‘सकाळ माध्यम समूहा’च्या वतीने सहकार महापरिषद (सकाळ महाकॉनक्लेव्ह) पार पडली. या महापरिषदेस लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीने पुरस्कृत केले होते. यातील चर्चेत ज्येष्ठ नेते शरद पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी नागरी सहकारी बँकिंग आणि पतसंस्थांचे प्रश्न संसदेत मांडण्याचे आश्वासन दिले होते. राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) विद्याधर अनास्कर यांच्यासह राज्यातील नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांचे पदाधिकारी आणि तज्ज्ञांच्या उपस्थितीत विचारमंथन करण्यात आले. त्यातील काही प्रमुख मुद्यांबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय महापरिषदेत घेण्यात आला होता. या अनुषंगाने ‘सकाळ’चे संपादक सम्राट फडणीस आणि कार्यकारी संपादक शीतल पवार यांनी रविवारी अमित शहा यांची भेट घेतली. महापरिषदेत मांडलेल्या प्रमुख प्रश्नांबाबतचे निवेदन शहा यांना देण्यात आले. यावेळी माजी सहकारमंत्री आमदार चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

### नागरी सहकारी बँकांच्या मागण्या...

- नागरी बँकांचे एकत्रीकरण आणि सहकारी बँकांचे रूपांतर व्यापारी बँकेत करून नागरी सहकारी बँकिंग क्षेत्र संकुचित करू नये.
- संचालक मंडळाच्या अधिकारात हस्तक्षेप करणाऱ्या तरतुदी वगळाव्यात.
- व्यवस्थापक मंडळाची संकल्पना रद्द करावी.

### सहकारी पतसंस्थांच्या प्रमुख मागण्या...

- पंतप्रधान आवास योजनेतंर्गत गृहकर्ज अनुदान योजनेत मल्टिस्टेटसह सहकारी पतसंस्थांना सहभागी करून घ्यावे.
- डिजिटल पेमेंट सिस्टिम सुरू करण्यास परवानगी द्यावी.
- थर्ड पार्टी चेक क्लिअरिंगच्या रकमेत पाच लाख रुपयांपर्यंत वाढ करावी.
- पतसंस्थांमधील ठेवींना पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळावे.